**वाहतुक शाखा, पुणे शहर**
**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे**

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ २५५८ /२०२५** **दिनांक :- २७/०३/२०२५**

**प्रसिध्दीपत्रक**

**दिनांक- २९/०३/२०२५ रोजी श्री. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा "बलिदान दिन" अनुशंगाने तुळापुर परिसरातील मार्गावर डंपर, मिक्सर, टिपर व सर्व मल्टी एक्सेल, जड वाहनांचे वाहतूकीतील बदला बाबत**

दि. २९/०३/२०२५ रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज समाधीस्थळ तुळापुर गाव येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान दिनानिमित्त तुळापुर येथे जाणाऱ्या अनुयायींच्या वाहनांकरीता पुणे नगर रोड हा मुख्य मार्ग असून अनुयायींची सर्व वाहने एकाच वेळी नगर रोडवरुन तुळापुर येथे जात असतात. त्यामुळे नगर रोड व तुळापुर फाटा ते आळंदी रोड, तळापुर परिसरातील मार्गावर मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीत राहणेकरीता सदर परिसरातील वाहतूकीत बदल करणे आवश्यक आहे. यास्तव महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अमोल झेंडे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन **आवश्यकते नुसार** व तेथील वाहतुकीच्या परिस्थितीनुसार वाहतुक व्यवस्थेमध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

## लोणीकंद वाहतुक विभाग अंतर्गत

**दि. २८/०३/२०२५ रोजी रात्रौ २२.०० ते दि. २९/०३/२०२५ रोजी रात्रौ २४.०० वा. पर्यत तुळापुर परिसरातील मार्गावर डंपर, मिक्सर, टिपर व सर्व मल्टी एक्सेल, जड वाहनांचे वाहतूकीत खालीलप्रमाणे बदल करीत आहे.**

- **पेरणे फाटा, मरकळ मार्गे, आळंदी पिंपरी चिंचवड कडे जाणाऱ्या जड वाहनांना मनाई करण्यात येत आहे.**
- **मरकळ नदी पुला मार्गे तुळापुर कडे येणाऱ्या जड वाहनांना पुलाचे पुढे प्रवेश बंदी करण्यात येत आहे.**
- **तुळापुर फाटा मार्गे आळंदी, पिंपरी चिंचवड कडे जाणा-या जड वाहनांना तुळापुर फाटाच्या पुढे प्रवेश बंद करण्यात येत आहे**
- **वाघोली, भावडी येथुन तुळापुर कडे जाणारे सर्व जड वाहनांना बंदी करण्यात येत आहे.**
- **जगताप डेअरी कडुन थेऊर फाटा, तुळापुर फाटा, पेरणे फाटा कडे जाणारे सर्व जड वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.**
- **सोलापुर रोड - खंडोबाचा माळ, थेऊर फाट्याकडुन लोणीकंद थेऊर फाटा मार्गे तुळापुरफाटा - मरकळ कडे जाणा-या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.**

(अमोल झेंडे)
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक,
पुणे शहर

**प्रति,**

१) **जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

**प्रत :- २)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक** , पुणे शहर.

**३)पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर

२/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४) **प्रभारी अधिकारी लोणीकंद** वाहतुक विभाग, पुणे शहर.

**५) पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**

२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / व्टिटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.